# 2020 - 21

**मराठी विभागातर्फे सत्र 2020-21 मध्ये कोरोना काळात सुध्दा कार्यकम घेण्यात आले.**

दि 28 जुन 2020 रोजी मराठीविभागातर्फे जागतीकीकरण कोरोणा आणी मराठी साहित्य याविषयावर राष्ट्रीय वेबीनार घेण्यात आले. या प्रसंगी उद्धाटन म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ. मुरलीधर चांदेकर तर मार्गदर्शक म्हणून मा.श्री उत्तम कांबळे, प्रमुख उपस्थती डॉ. सुनिल अवचार तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.रामकृष्णदादा शेटे होते.





विदर्भ दर्पण
बुधवार, दि. १ जुलै २०२० ७

# कोरोना ही जागतिकीकरणाची देण नाही : उत्तम कांबळे एस.पी.एम.मध्ये राष्ट्रीय वेबिनार संपन्न



**प्रति./चिखली :** स्थानिक शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये आय क्युएसी अंतर्गत मराठी विभागाद्वारे आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार दि.२८-०६-२०२० रोजी संपन्न झाला. वेबिनारमध्ये चर्चेसाठी जागतिकीकरण, कोरोना आणि मराठी साहित्य हा विषय घेतलेला होता. या वेबिनारामध्ये देशभरातुन ८६३ अभ्यासक सहभागी झाले होते. झुम आणि यु ट्युबच्या माध्यमातुन ऑनलाईन पध्दतीने पार पडलेल्या या वेबिनारचे अध्यक्ष रामकृष्णादादा शेटे-अध्यक्ष शिक्षण प्रसारक मंडळ चिखली, उद्‌घाटक म्हणुन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु मुरलीधर चांदेकर लाभले होते. तर वेबिनारला मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यीक तथा सकाळ वृत्तपत्राचे संपादक उत्तम कांबळे लाभले होते. तर समारोपीय सत्रासाठी मुंबई विद्यापीठाचे प्रा.डॉ.सुनिल अवचार तर लंडन येथुन डॉ.बालमुंकुद भाला सहभागी झाले होते.

मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी साहित्यातील जागतिकीकरण समजून सांगताना म्हणाले संत ज्ञानेश्वर माऊली नि विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले आहे आणि महात्मा ज्योतिबा फुल्यांनी आपले गुलामगिरी हे पुस्तक एका अमेरिकन निग्रोला अर्पण केले याला साहित्यातील जागतिकिकरण म्हणता येणार नाही हे मानवाने मानुसकीचे सांगितलेले नाते आहे.अमेरिकेतला ब्लॅक आणि आपल्या देशातला दलित एक सारखांच आहे हे दाखवणार आहे. जागतिकिकरणामुळे भुगोलातील अंतर कमी होऊन मानसा-मानसातील अंतर वाढले ओ. ग्लोबलायएजेशनमुळे पुरी दुनिया केवळ मुठभर लोकांच्या मुठीमध्ये सामावलेली आहे. वामनदादा कर्डकांच्या ओळी सांगत पुरे झाले बिरला, गोदरेज, बाटा अन् टाटा यामध्ये सांगा कुठे आहे माझा वाटा, सामान्य माणुस हा गरीबच राहिला आहे. एकीकडे माणसाचं पाऊल चंद्रावर अन् मंगळावर पडत असतांना हजारो मुलं कुपोषणाने मरत आहेत हा संघर्ष भारत विरुध्द इंडिया असा झाला आहे.

ते पुढे म्हणाले जागतिकरणाची देणं कोरोना म्हणजे अंत्यत चुकीचे आहे प्लेग, कॉलरा, पटकी अश्या विविध साथींचे रोग आले आहे प्लेगच्या साथीतून तर मरीआईचा जन्म झाला आहे. प्लेगची साथ ही झोपडीतून आली म्हणून गरीबांच्या झोपडपट्ट्या त्यांच्याकडे असल्या नसल्या सामानासहीत जाळण्यात आल्या आहेत. त्याहीकाळात साथीचा रोगांच्या आगमनाचा बळी गरीब ठरला होता. आजही गरीबाला आपल्या हक्काच्या निवाऱ्यासाठी हजारो किलोमिटरची पायपिट करावी लागली. गंभीर बायकोसह अन लहान मुलांनाही पायी जावं लागलं, ही साथ विशिष्ट वंशामुळे, धर्मामुळे आली हे म्हणजे चुकीचे आहे. महामारीला जात, धर्म, वंश नसतो, येणाऱ्या काळात कोरोनाच्या मुळे बळी ठरलेल्या सर्वांचे, विदारक परिस्थितींचं, हालअपेष्टांचं चित्रण साहित्यातुन येणारच आहे. कोरोना ही लोकांसाठी एक संधी आहे. कोरोनाच्या दुःखावर लिहा, उपायावर लिहा असा सल्लाही त्यांनी दिला. त्यांच्या प्रमुख मार्गदर्शनानंतर प्रश्नोत्तरे झालीत यामध्ये लंडनवरुन डॉ.बालमुकुंद भाला, दिनेश खेडकर, डॉ.दिगंबर कापसे, डॉ.भाऊसाहेब गव्हाणे, गजानन बनसोड, डॉ.माया इत्यादिंनी सहभाग घेतला. उद्‌घाटनपर भाषणात मा. कुलगुरु यांनी विषयाची निवड कल्पकतेने केली असुन हया विषयाच्या निमित्याने तिन्ही विषयाची चर्चा आणि त्याचा समाजमनावर होणाऱ्या परिणामांची चर्चा या वेबिनारमध्ये होणार आहे असा विश्वास व्यक्त केला. शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रेमराज भाला यांनी जागतिकिकरण आणि कोरोनाच्या आपत्तीवर आपले विचार व्यक्त करुन वेबिनारसाठी शुभेच्छा दिल्यात.

शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामकृष्णदादा शेटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जागतिकिकरणाची पार्श्वभूमी, करार याचा साक्षीदार या नात्याने आढावा घेतला. त्याचा व्यापार, कृषी आणि समाजमनावरचा परिणाम व्यक्त करुन या वेबिनारच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ.सुभाष गव्हाणे, समन्वयक प्रा.डॉ.प्रफुल्ल गवई, आयोजन समितीचे प्रा.डॉ.प्रदिप बारड, प्रा.विजय वाकोडे, प्रा.डॉ.नागेश गायकवाड यांचे कौतुक केले.

जागतिकिकरण आणि जागतिकिकरणाच्या कविता सादर करुन प्रा.डॉ.सुनिल अवचार यांनी समारोप केला. या राष्ट्रीय वेबिनार मध्ये ८६३ संशोधक प्राध्यपकांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. प्रफुल्ल गवई तर आभार प्राचार्य डॉ. सुभाष गव्हाणे यांनी केले.


२. दि. 29 एप्रिल 2021 रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे 34 वे ऑनलाईन अधीवेशन घेण्यात आले. या प्रसंगी उद्घाटक म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू मा.डॉ.मुरलीधर चांदेकर, परीषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. गजानन जाधव हे होते.




10:25
Prin.Dr.Gajanan Jad...
Govind Gayki
Dr Praful Gawai
Dr. Pavan Mandavk...
Dr.Kashinath Barha...
Ramkrishna Shete
iPhone
Subhash Gawhane
Smtrs
Dr. Keshao Phale
Prof.Dr.Avinash K...
Damodar ambhore
zoom


Prin.Dr.Gajanan Jad...
Govind Gayki
Dr Praful Gawai
Dr. Pavan Mandavk...
Ramkrishna Shete
iPhone
Subhash Gawhane
Smtrs
Dr. Keshao Phale
Prof.Dr.Avinash K...
Dr. Pramod Garode
Damodar ambhore
zoom


Prin.Dr.Gajanan Jadhav, Deulgaon Raja
zoom


Recording...
LIVE
on YouTube
Gallery View
Exit Full Screen
Talking: alka gaikwad
From Madhuri Bhatkar to Everyone
vivo X50
Apr 29, 2021, 13:09
Security
Participants
Chat
Share Screen
Reactions
More
End


Admit
View
Dr. Kedar Thosar
Bhumika Wank...
Prof.Dr.Avinash...
iPhone
Start Video
Security
Participants
Chat
Share Screen
Pause/Stop Recording
Reactions
More
End

